महाराष्ट्र शासन

क्रमांक- प्रनजोसी-१५८४/८४१९/विशि-४

शिक्षण व सेवायोजन विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक- १८ ऑगस्ट, १९८४.

प्रति,

कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय:- १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून शारिरिक शिक्षण महाविद्यालयांना (बी.पी.एड्.कॉलेज) परवानगी देण्याबाबत..

महोदय,

१९८४-८५ या वर्षापासून नवीन शारिरिक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्याकरिता संबंधित विद्यापीठामार्फत न येता परस्पर शासनाकडे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करुन मागास समाज सेवा मंडळ, सोलापूर या संस्थेस १९८४-८५ पासून सोलापूर येथे नवीन शारिरिक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे. या संस्थेने आपला अर्ज शिवाजी विद्यापीठ अधिनियम १९७४ मधील कलम ४१ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार शिवाजी विद्यापीठाकडे पाठवावा. या अधिनियमाच्या कलम ४१ (४) नुसार विद्यापीठाने तो अर्ज शासनाकडे पाठविण्याची विद्यापीठाची हरकत नाही असे समजून शिवाजी विद्यापीठ अधिनियमाच्या कलम ४१ (४) व (५) अन्वये विद्यापीठाने अर्जावर पुढील कार्यवाही करण्यास शिवाजी विद्यापीठास शासन परवानगी देत आहे.

२. शासनाने संलग्निकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटीवरच आहे :-

१) १९८४-८५ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रस्तावित शारिरीक शिक्षण महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित राहील. विद्यापीठाने ~~विहित केलेल्याप्रमाणे आवश्यक तेवढ्या विद्यार्थ्यांना बी.पी.एड.~~ अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावा. तथापि प्रवेश क्षमता १२० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त नसावी.

२) प्रस्तावित महाविद्यालयाला संलग्नीकरण देण्याच्या संदर्भात विद्यापीठाने विहित केलेल्या सर्व अटींचे महाविद्यालयाने पालन करावे

३) याबाबत शासनाकडून प्रस्तावित महाविद्यालयाला कुठल्याही प्रकारचे अनुदान देय होणार नाही.

क्र.मा.प. २/-

TRUE COPY

प्राचार्य

४. स्थानिक चौकशी समिती, अॅकेडेमिक कान्सिल, एक्झीक्युटीव्ह कौन्सिल व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठास प्राप्त झाल्यावर शिवाजी विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ अधिनियम १९७४ मधील कलम ४१ (६) व (७) नुसार या महाविद्यालयाच्या अंतिम संलग्नीकरणाचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

५. हे पत्र समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभागाचे संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

या पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनास पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

प्र. कृ. रागदेव

( प्र. कृ. रागदेव )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

अध्यक्ष, भागास समाज सेवा मंडळ, नेहरुनगर, सोलापूर, यांना अग्रेषित.

परिच्छेद १ मध्ये सुचित केल्याप्रमाणे सदर संस्थेने ८४-८५ पासून शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करणेबाबतचा अर्ज शिवाजी विद्यापीठाकडे केला नसल्यास तो ताबडतोब करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. तसेच या संस्थेस शारिरिक शिक्षण महाविद्यालय उघडण्यास देण्यात येणारी परवानगी वरील परिच्छेद २मध्ये नमूद केलेल्या अटींवरच देण्यात आलेली आहे. हे कृपया त्यांनी लक्षात घ्यावे.

प्रत, शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, कोल्हापूर

समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग

( कार्यासन प्रशि-५ )

निवड नस्ती, विशि-२

पोक्रके : १८८८४

TRUE COPY

Principal